महा मेट्रो
PUNE METRO
Helpline No.
18002705501

# जागतिक पातळीवरील पुनर्रोपण पद्धतीनुसार महामेट्रो करणार वृक्षांचे पुनर्रोपण- डॉ. दीक्षित

- मेट्रो निगडीपर्यंत न्यावी यासाठी आवश्यक डीपीआर बनवा - पिंपरी चिंचवड स्थायी समितीची महामेट्रोला विनंती

**पुणे, दि. २ डिसेंबर, २०१७ :** पुणे आणि पिंपरी चिंचवड शहर परिसरात सध्या महामेट्रोच्या वतीने मेट्रो प्रकल्पांच्या दोन मार्गिकांचे काम सुरू आहे. हे काम सुरू असताना प्रकल्पाच्या मार्गात अनेक वृक्षांचे अडथळे येत आहेत. सदर वृक्षांचे पुनर्रोपण ही संपूर्णतः महामेट्रोची जबाबदारी असून त्या अंतर्गत या वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात येणार असल्याची माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

विशेष म्हणजे जागतिक पातळीवर सर्वमान्य असलेल्या पुनर्रोपण पद्धतीनुसार हे पुनर्रोपण करण्यात येणार असून या पद्धतीने पुनर्रोपण केल्यास वृक्षांचा तग धरण्याचा दर हा सर्वाधिक असल्याने महामेट्रो ही पद्धत अवलंबित आहे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या पद्धतीनुसार पिंपरी येथील वल्लभनगर एसटी स्टॅण्डमागे असलेल्या सहयोग केंद्राच्या आवारात वरील पद्धतीने पहिल्या दहा वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

याबरोबरच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीपासून निगडी पर्यंत मेट्रो मार्गिका न्यावी जेणेकरून जास्तीत जास्त नागरिकांना मेट्रोचा फायदा होईल, अशी मागणी सातत्याने

नागरिकांकडून होत आहे. ही मागणी लक्षात घेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने आवश्यक डीपीआर बनविण्याची विनंती महामेट्रोकडे केली असल्याची माहितीही डॉ. दीक्षित यांनी दिली.

मेट्रो प्रकल्पाचे काम हे सध्या भोसरी (नाशिक फाटा ते खराळवाडी) आणि सीएमई ते मेगामार्ट या दोन ठिकाणी सुरू असून तेथे आतापर्यंत संपूर्णपणे ४ खांब उभारण्यात आले आहे. याबरोबरच पीअर कॅप शिवाय ११ खांब उभारले गेले आहेत तर ४८ खांबांचा पाया रचण्यात आला आहे. हॅरीस ब्रिज येथील काम हे गुरुवार ७ डिसेंबर पासून सुरू होणार असून पावसाळ्यापूर्वी ३० जून, २०१८ पर्यंत तेथील सबस्ट्रक्चर पूर्ण होईल. याशिवाय मेट्रोसाठी आवश्यक ४१ सेगमेंट देखील तयार असून व्हायाडक्टचा पहिला स्पॅन हा अंदाजे २६ डिसेंबर पर्यंत तयार असेल, अशी माहिती डॉ. दीक्षित यांनी यावेळी दिली.

मेट्रो प्रकल्पात येणा-या स्थानकांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून या अंतर्गत संत तुकाराम नगर येथे मेट्रोचे पहिले स्थानक तयार होणार आहे. यासाठी आवश्यक त्या सर्व बाबींचे सर्वेक्षण २८ नोव्हेंबरपासून सुरू झाले असून स्थानकाचा जिओ टेक्निकल सर्व्हे हा देखील प्रगतीपथावर आहे.

याबरोबरच संत तुकाराम नगर येथील मेट्रो स्थानकाजवळ नवीन फूट ओव्हर ब्रिज (एफओबी) तयार करण्यात येणार आहे. या पुलाच्या मदतीने मेट्रो स्थानक हे दुस-या बाजूला वल्लभनगर बस स्थानक व आयटी इंडस्ट्री यांना जोडण्यात येणार आहे. सदर पुलाची लांबी ही ६५ मीटर तर रुंदी ६ मीटर इतकी असणार आहे. याचा उपयोग मेट्रो स्थानकावर उतरणा-या प्रवाशांबरोबरच या भागातील पादचा-यांनाही होईल. याशिवाय सदर पूल हा जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान वापरून तयार करण्यात येणार असून तो वास्तुस्थापनेचा उत्कृष्ट नमुना असेल. याशिवाय नवीन पूल बांधल्या नंतरच जुना पूल पाडण्यात येईल, असेही डॉ. दीक्षित यांनी नमूद केले.